जिल्हाउद्योग मित्र समितीची सभा दि.७/०७/२००९ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता मा. श्री रमेश सुरवाडे निवासी उपजिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचे अध्यक्षतेखाली राजस्व सभागृह जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, रायगड-अलिबाग येथे सपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त

| अ.क्र | मुद्दा उपस्थित केलेल्या संघटनेचे /संस्थेचे/उद्योग घटकाचे नांव | मुद्दा/विषय | घेतलेला निर्णय | कार्यवाही करणा-या कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | सदस्य सचिव जिउमी रायगड | विषय क्र.१.दि.०६/११/०८ रोजी झालेल्या जि.उ.मी.सभेचे इतिवृत्त कायम ठेवणे | दि.०६/११/०८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त संबंधित विभागांना पाठविण्यात आल्याचे व त्यावर कोणाचे आक्षेप नसल्याबाबत खातरजमा केल्यावर सर्वानुमते इतिवृत्त कायम केले आहे. | |
| २. | सदस्य सचिव जि.उ.मी.रायगड | विषय क्र.२.दि.६/११/०८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावरील कार्यवाहीचा आढावा | मा.श्री रमेश सुनवाडे निवासी उपजिल्हाधिकारी रायगड-अलिबाग तथा अध्यक्ष जि.उ.मी यांनी दि.६/११/०८ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर मुद्दे निहाय आढावा घेतला.व उद्योजकांच्या उपस्थितीवर नाराजी व्यक्त केली व उद्योजकांनी दर महिन्याला त्यांचे विभागातील प्रश्न महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांना कळवावे.म्हणजे जिल्हास्तरावर त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करता येतील. | |
| ३. | रोहा औद्योगिक संघटना | रोहा व महाड रेल्वे स्थानकावर सर्व जलद गाडयांना थांबा व रोहा पनवेल शटल सेवा सुरु करणेबाबत. | सदरहू विषय राज्य उद्योग मित्र समितीकडे दि.०७/०४/०७ रोजी पाठविण्यात आला होता.त्यानुसार निमंत्रक, उद्योग मित्र यांनी राज्यपातळीवर उद्योग मित्र समिती सभेत चर्चा करुन मध्य रेल्वे सिएसटी यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २०/०८/०७ अन्वये उद्योग मित्र समितीला कळविल्या प्रमाणे नेत्रावती एक्सप्रेस व चार पॅसेंजर गाडया थांबातात व उर्वरीत गाडयांमध्ये सदर परीसरातील केवळ पाच सहा तिकीटे विक्री होत असल्यामुळे पर्यायाने आर्थिक दृष्टया त्या गांडयांना थांबा परवडणारी नाही. असे सदस्य सचिव तथा प्र.महाव्यवस्थापक जि.उ.मी.यांनी सांगितले. मा.अध्यक्षांनी सदर विषयांवर जिल्हास्तरावर निर्णय होत नसल्याने सदर विषय राज्य उद्योग मित्र समितीकडे पाठविण्यात यावा. असे सांगितले आहे. | राज्य उद्योग मित्र समिती जिउके मध्य रेल्वे सिएटी पनवेल रोड कोलाड निवन रेल्वे |
| ४. | रोहा औद्योगिक संघटना | रोहा कोलाड मिनी बस सरु करणेबाबत | .याबाबत डेपो मॅनेजर,रोहा यांनी त्यांचे पत्र दि.०१/०६/०९ नुसार असे कळविले आहे की सदर मिनी बसेस कालवाहय झाल्यामुळे रा.प.महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सदर गाडया बंद करण्यात आल्या.रोहा कोलाड मार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या इतर फे-या सुरु आहेत.राज्य परिवहन महामंडळाकडे नव्याने मिडी बसेस सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.सदर बसेस आल्यास रोहा कोलाड मार्गावर सुरु | राज्यपरिवहन महामंडळ व रोहा औद्योगिक संघटना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करण्याबाबत विचारार्थ असल्याचे कळविल्याचे सदस्य सचिव जिउमी यांनी सांगितले.मा.अध्यक्षांनी असे सूचित केले की राज्य परिवहन महामंडळाने या ठिकाणी बसफे-या वाढवाव्यात. | |
| ५. | सदस्य सचिव जिउमि | रायगड पेट्रोलियम लि.महाड यांचे कारखान्यातील खंडीत विजपुरवठयाबाबत | सदरहू बाबतीत कार्यकारी अभियंता एमआयडीसी महाड व अ.अ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, पेण यांचे कडे पाठपुरवा करण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी सूचविले . | एमआयडीसी अणि महावितरण |
| ६. | महाड औद्योगिक संघटना | एमआयडीसी महाड येथील बंद खटाव मिल बाबत. | सदरबाबतीत एमआयडीसी,पनवेल,महाड,अलिबाग यांच्याशी पाठपुरावा चालू असून खटाव मिलबाबत बीआयएफआर समोर सुनावणी झाली असून निर्णय प्रलंबित आहे.सदर विषयावर निर्णय होत नसल्याने सदर मुद्दा वगळण्याची मा.अध्यक्षांनी विनंती केली. | एमआयडीसी महाड |
| ७. | रोहा औद्योगिक संघटना | सांडपाणी वाहून नेणा-या वाहीनी बाबत रोहा कोलाड क्रॉस ड्रेन्स बंद आहेत. | सदर कामाच्या निविदा मुख्यालयाला मंजुरीसाठी पाठविल्याचे कार्यकारी आभियंता, एमआयडीसी, आलिबाग यांनी कळविले आहे.प्रस्ताव मंजुर होताच सांडपाणी वाहीनी टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.सदर विषयावर मा.अध्यक्षांनी मुख्यकार्यकारी अधिकारी एमआयडीसी मुंबई व बांधकाम खाते महाड यांच्याशि पत्रव्यवहार करुन पाठपुरवठा करावा.असे सूचविले | एमआयडीसी व प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| ८. | तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन | बेलापूर सीबीडी,तळोजा, कळंबोली बस सेवा सुरु करणेबाबत. | सदरबाबतीत श्री जे.एस.पापळकर परीवहन उपक्रम अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र.नमुंमपा/परि/नियोजन/२३८/२००९, दि.२२/०५/०९ अन्वये असे कळविले आहे की सदर बाबतीत ऑटोरिक्षा संघटनेकडे नकारात्मक भूमिका असल्यामुळे सदर प्रश्न सुटणार नसल्याचे सांगितले.पोलीस विभाग व सहा आसनी रिक्षा चालक संघटनांकडून योग्य सहकार्य मिळाल्यास सदरचा मार्ग पूर्ववत करण्यास कोणतीही अडाचण राहणार नाही. .याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी पोलीस आयुक्त नवी मुंबई व वाहतूक आयुक्त मुंबई यांच्याशी पत्रव्यवाहर करुन पाठपुरवठा करावा असे मा.अध्यक्षांनी सुचविले. | परिवहन उपक्रम अधिकारी नवी मुंबई महानगर पालिका,जिउकें, पोलिस आयुक्त नवी मुंबई |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | नवीन मुद्दे :-<br>जिउकें | विळे भागाड, ता.माणगांव येथील वितरीत केलेल्या भूखंडाना सोयी सुविधा पुरविणेबाबत | १.विळे भागाड,ता.माणगांव येथील एकूण २१२ भूखंड व महाड येथील अतिरिक्त एमआयडीसी मध्ये २० भूखंड वितरीत करण्यात आलेले आहेत.परंतु तेथे मुलभुत सोयी-सुविधा उदा.वीज,पाणी व रस्ते तसेच भुखंड हस्तांतरीत न झाल्यामुळे साप्रोयो २००७ अंतर्गत लाभ देणे शक्य होणार नाही.साप्रायो २००७ अंतर्गत दि.३१/०३/२०११ पर्यंत अंतीम परिणामकारक टप्पा पुर्ण करण्याची अंतिम तारीख असल्यामुळे एमआयडीसीने उपरोल्लेखित बाबी सोडविण्यात याव्यात.<br>मा.अध्यक्षांनी असे सूचविले की सदर मुद्दा राज्य उद्योग मित्र समितीकडे पाठविण्यात यावा तसेच मुख्यकार्यकारी अधिकारी एमआयडीसी मुंबई व विकास आयुक्त (उद्योग) यांच्याशी पत्र व्यवहार करावा. | एमआयडीसी |
| १०. | तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन | वीज पुरवठा व पाणी पुरवठा साप्ताहीक बंद एकाच दिवशी ठेवण्याबाबत. | २.तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, तळोजा यांच्या लेखी निवेदनानुसार तळोजा एमआयडसी मध्ये मंगळवारी साप्ताहीक वीज बंद असते व शुक्रवारी साप्ताहीक पाणी पुरवठा बंद असतो.त्यामुळे उद्योजकांचे उत्पादनात दोन दिवस खंड पडतो.तरी वीज पुरवठा व पाणी पुरवठा हा मंगळवारी वा शुक्रवारी एकाच दिवशी साप्ताहीक बंद ठेवण्यात यावा, जेणे करुन आठवडयातील एकच दिवस उद्योग बंद राहतील.<br>**मा.अध्यक्षांनी महावितरण व एमआयडीसी यांच्याशी पाठपुरावा करुन पाणीपुरवठा व विजपुरवठा एकाच दिवशी साप्ताहिक बंद ठेवण्यात यावा असे सूचविले.** | महावितरण व एमआयडीसी |
| ११. | तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन | तळोजा औद्यागिक क्षेत्र उद्योग नगरी घोषित करण्याबाबत. | ३.उद्योग नगरी धोरण राबविण्याबाबत तळोजा असोसिएशन यांनी ताळोजा औद्योगिक क्षेत्र हे उद्योग नगरी घोषित करुन उद्योजकांना ग्रामपंचायत व म.औ.वि.म यांचे दुहेरी (कर व सेवा करातून) कर भरावे लागणार नाही.<br>सदर विषय जिल्हास्तरीय सभेच्या कक्षेत येत नसल्याने राज्य उद्योग मित्र समितीकडे पाठवावा असे मा.अध्यक्षांनी सूचविले. | राज्य उद्योग मित्र समिती |
| १२. | तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन | तळोजा औद्योगिक वसाहतीत वाहनतळ तयार करणेबाबत. | ४.तळोजा औद्योगिक वसाहतीत वाहनतळ तयार करण्याबाबत तळोजा असोसिएशन यांनी विनंती केली आहे.सद्य:स्थितीत वाहन तळ नसल्याने,पर्यायाने वाहने रस्त्यावर उभी केल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे.<br>सदर विषयांवर चर्चा झाल्यावर मा.अध्यक्षांनी मुख्यकार्यकारी अधिकारी एमआयडीसी मुंबई व विकास आयुक्त उद्योग मुंबई यांचे बरोबर पत्रव्यवहार करावा असे सुचविले. | एमआयडीसी मुंबई व विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |

वरील प्रमाणे कामकज आटोपल्यावर तसेच सभुपढे अन्यविषय न आल्याने सदस्य सचिवांनी मा.अध्यक्षांच्या अनुमतिने सभेचे कामजकाज संपल्याचे जाहिर केले.

(एम.आर.खडसे)

सदस्य सचिव,जिउमिस,रायगड अलिबाग तथा
प्र.महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,रायगड-अलिबाग

(रमेश सुरवसे)

अध्यक्ष जिउमिस,रायगड-अलिबाग
निवासी जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग